पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
शिक्षण/प्राथमिक/प्रशा/2/का वि
२१/९३ दिनांक : २४/५/९४

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका

मृत्युंजय एज्यु. सोसा. प्राथ. विभाग,
सांगवी २७

विषय : विना अनुदानित खा.प्रा.शा. (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त) अनुदान मंजूर करणे बाबत.

संदर्भ : प्राशि/खाप्राशा/अनुदान/पीएमसी
दिनांक - २९/३/९३

2/- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी उपरोक्त आदेशान्वये आपले शाळेकरीता सन १९९२-९३ पासून २५% अनुदान ~~टक्के~~ टक्के मंजूर केले आहे. हे अनुदान अदा करताना महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र.व्ही.एस.एल. 7088/(8779)पाशि-1, दि.28/4/89 मधील मान्य अटी विचारात घेवून व त्यानुसार आपले शाळेचा पूर्तता अहवाल आलेनंतर अनुदानाची रक्कम अदा करणेकामी कार्यवाही करणेत येणार आहे. ~~[illegible]~~

मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 मधील नियम क्र.11 115 मधील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. तसेच दि. 28/4/89 चे शासन निर्णयानुसार आवश्यक त्या कागदपत्रांच्या पततेच्या दृष्टीने खालील अटींचे पालन होणे आवश्यक आहे.

1) मिळालेले अनुदान असेसमेंट रजिस्टरला धरून घ्यावे.
2) दिनांक 28/4/89 चे शासन निर्णयातील मुद्दा क्र. 7(1) व (5) बाबत शाळेच्या मुख्याध्यापकांनी रू.10/- चे स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे व तद्नंतर मुद्दा क्र. 7(2), (3) व (4) बाबत शिक्षण मंडळ कडील पर्यवेक्षक आपले शाळेची योग्य ती तपासणी करून आपल्या अभिप्राय सह सविस्तर अहवाल सादर करीतील.
3) अनुदान हे मान्य पदावरील शिक्षकांच्या वेतनावर सन १९९२-९३ पासून २५% प्रमाणे देणेत येऊन पुढे टप्प्याटप्प्याने वाढ केली जाईल.
4) शाळेतील शिक्षकांच्या नेमणूका करताना त्यांच्या वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता या अटींची पूर्तता त्वरीत करून जादा वयाच्या शिक्षकांच्या मान्यता साठी मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
5) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन जिल्हयाच्या मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत अदा करणे आवश्यक असलेने वेतन वाटप व वेतनेतर खाते उघडल्या बाबत पुरावा सादर करावा. प्रत्येक शिक्षकाचे स्वतंत्र खाते बँकेत उघडावे.
6) विद्यार्थ्यांकडून घेतली जाणारी मासिक फी ही शासनाच्या नियमानुसार घेऊन सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात घेतलेल्या फीचा हिशोब सादर करावा.

7) शिक्षकांची पदे सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूर करून होणे जरूरीचे आहे. तसेच 30 सप्टेंबर ९२ प्रमाणे विद्यार्थी संख्या व तुकडी संख्या निश्चित करून मान्यता होणे आवश्यक आहे.

8) शासन शिक्षण व सेवायोजन विभागाकडील निर्णय दि. 8/2/74 मधील अनुदान देण्याच्या नियमांची पूर्तता झाली पाहिजे.

9) संबंधित शाळेने/संस्थेने शासनाविरूद्ध न्यायालयामध्ये अनुदानाबाबत दा याचिका दाखल केलेला नसावा.

10) संस्थेविरूद्ध गंभीर स्वरूपाच्या अथवा कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तकारी नसाव्यात.

11) शाळेतील मंजूर वर्गाकडून नियमानुसार सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

12) सदर शाळेने शासनाकडून वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

13) सदर शाळेमध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी मान्य केलेली शैक्षणिक अर्हता असलेले प्रशिक्षित शिक्षक नेमणू आवश्यक आहे. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करताना यापुढे रोस्टर पाळणे आवश्यक आहे.

14) शाळेतील जे वर्ग अथवा तुकड्या सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यांनाच फक्त अनुदान मंजूर ~~करणे~~ केले आहे.

वरील अटींची पूर्तता करून अहवाल सादर केलेनंतर आपल्या शाळेला टप्प्याटप्प्याने अनुदान मंजूर करणेत येइल. यामध्ये कोणत्याही त्रुटी किंवा उणिवा आढळल्यास सदरची बाब मा. शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या निदर्शनास आणून देणेत येइल व त्यामुळे अनुदान अदा करणेस विलंब लागलेस त्याबाबत इकडील कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. या कृपेने नोंद घ्यावी. तसेच शाळेस एखाद्या वर्षात जादा अनुदान दिले गेले तरी त्याची वजाती पुढील वर्षातील अनुदानातून केली जाइल. तसेच अटींची पूर्तता त्वरीत करून सर्व कागदपत्रे या कार्यालयास सादर करावी.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 18

प्रत :- संबंधित विभागीय पर्यवेक्षक
श्री/~~श्रीमती~~ बी एन डोळस

3/- आपले विभागातील संबंधित खाजगी शाळेकडून उपरोक्त बाबींची पूर्तता करून घेऊन त्यबाबतचा लेखी अहवाल दयावा.

प्रत :- मा. शिक्षण उपसंचालक,
17 आंबेडकर रोड,
पुणे विभाग, पुणे 1.